शनिवार दि.१६ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com

# खोडा घालणाऱ्यांना जोडा दाखवा:माझी लाडकी बहीण योजने वरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधी पक्षांवर पलटवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील बहिणींना पैसे मिळू नये यासाठी सावत्र भाऊ प्रयत्न करत आहेत. त्यात खोडा घालत आहेत. त्यांना जोडा दाखवा, अशा प्रकारचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. लाडकी बहिण योजनेविरोधात हे कोर्टात देखील गेले होते. मात्र, न्यायालयाने देखील त्यांची याचिका फेटाळून लावली आहे. त्यांना चपराक दिली आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना पैसे देण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे.

देणारे कोण आणि घेणारे कोण? या आमच्या महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना माहिती आहे. आमच्याकडे देना बँक आहे तर त्यांच्याकडे लेना बँक आहे. आमच्या महाराष्ट्रातील महिला भगिनी सुज्ञ आहेत. हुशार आहेत. त्यांना सर्व गोष्टीची जाणीव असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. जे या योजनेत खोडा घालत आहेत त्यांना जोडा दाखवा, असे आवाहन देखील मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यातील महिलांना केले आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेला राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना सन्मान देण्याचे काम राज्य सरकार करत असल्याचा दावा सत्ताधारी पक्षाकडून केला जात आहे. तर पैसे मिळू नये म्हणून सावत्र भावांचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप सत्ताधारी पक्षाकडून केला जात आहे. विरोधकांच्या प्रचारावर राज्य सरकार देखील चांगलेच आक्रमक झाले आहे. विरोधकांच्या या आरोपांना उत्तर देण्याचे काम सरकारच्या वतीने केले जात आहे. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील विरोधकांना सावत्र भावाची उपमा देत राज्यातील महिला सरकारच्या पाठीशी उभे राहणार असल्याचा दावा केला आहे.



## कोलकाता मधील प्रकाराचा जाहीर निषेध

# आष्टी तालुका डॉक्टर्स असोसिएशनचे सर्व वैद्यकीय सेवा बंदीचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी | अण्णासाहेब साबळे




९ ऑगस्ट २०२४ रोजी,आरजी कार मेडिकल कॉलेज,कोलकाता येथे एका तरुण पोस्ट-ग्रॅज्युएट चेस्ट मेडिसिनच्या विद्यार्थीनीचा ड्युटीवर असताना क्रूरपणे बलात्कार करुन हत्या करण्यात आली.या भीषण घटनेने वैद्यकीय समुदाय आणि देशाला धक्का बसला आहे.याच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांनी आधीच संप सुरू केला आहे.आणि इंडियन मेडिकल असोसिएशनने देशभरात आंदोलन आणि निषेध मोर्चे आयोजित केले आहेत.

या गुन्ह्याच्या तपासात कॉलेज प्रशासन आणि पोलिसांचा प्रतिसाद संशयास्पद होता आणि प्रामाणिकपणे तपास सुरू ठेवण्यास ते अयशस्वी ठरले. आर जी कार महाविद्यालय प्रशासन व पोलिस यांच्या संगनमताने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याने दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी,कोलकता उच्च न्यायालयाने राज्य पोलिसांना या प्रकरणाची जबाबदारी केंद्रीय तपास यंत्रणेला (उइख) हस्तांतरित करण्याचे आदेश दिले.१५ ऑगस्ट २०२४ रोजी, आरजी कार मेडिकल कॉलेजला मोठ्या जमावाने तोडफोड केली आणि आंदोलन करणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांवर हल्ला केला.यावेळी जमावाने गुन्हा झालेली जागेचीही तोडफोड करुन पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला.हा घटनाक्रम डॉक्टर,विशेषतः महिलांच्या हिंसेच्या वाढत्या धोक्याचा आणि वैद्यकीय सुविधांमध्ये सुरक्षेच्या आवश्यकतेचा संकेत देतो.या गुन्ह्यातील पीडितांच्या समर्थनार्थ आणि चालू असलेल्या हिंसाचारविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन १७ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ६ ते १८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ६ पर्यंत २४ तासांच्या सेवा बंदीचा आवाहन करतो. अत्यावश्यक व आपात्कालीन सेवा सुरू राहतील.पण नियमित बाह्यरुग्ण तपासणी आणि शस्त्रक्रिया बंद ठेवण्यात येतील.

इंडियन मेडिकल असोसिएशन सर्व देशवासीयांना या गुन्ह्यातील पीडित महिला डॉक्टरांच्या कुटुंबियांस न्याय मिळवून देण्यासाठी या संपास समर्थन देण्याची विनंती करते आणि डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी योग्य ती यंत्रणा उभी करुन कायद्या बदल करण्याचा आग्रह केंद्रशासनाकडे करते.




लोकसभा प्रमुख रामदास पाटील सुमठाणकर यांनी सापटगाव येथे रामेश्वर शिंदे यांच्या निवासस्थानी संदीच्या भेट दिली यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती सेनगाव चे सभापती अशोकराव ठेंगल ,नगरसेवक सतीश अंकल खाडे ,भाजप नेते ओम कोटकर, रामराव काका अवचार सुरज विटकरे, सरपंच वसंतराव अवचार, व आदी कार्यकर्ते उपस्थित होते,

## समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी कडून

# हरघर तिरंगा च्या निमित्ताने महा जनजागृती रॅली संपन्न




लोकनेता न्यूज नेटवर्क

देऊळगाव राजा | प्रतिनिधी

दि. ०९ ऑगस्ट, २०२४ ते दि. १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत हर घर तिरंगा' उपक्रम राबवायचा सुचना महाराष्ट्र राज्य सरकार कडुन प्राप्त झाले. देशाबद्दल आदर, प्रेम, भावना व राष्ट्रभक्ती वाढीस लागावी यासाठी महाविद्यालय परिसराच्या आजुबाजुस असणाऱ्या वस्तीत घरोघरी तिरंगा लावण्याचे आवाहन मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केले होते.

त्या अनुषंगाने दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी समर्थ कॉलेज फार्मसी देऊळगावराजा येथे हर घर तिरंगा ह्या कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व विद्यार्थ्यांना ह्या कार्यक्रमामध्ये सक्रियपणे सहभागी होण्याचे तसेच हर घर तिरंगा ह्या संकल्पनेचा प्रचार प्रसार करण्याचे आवाहन केले गेले. ह्या कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल रमेश ताठे ह्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच राष्ट्रध्वजाचे महत्व तथा राष्ट्रध्वज हाताळताना त्याच्या अस्मितेची कसलीही अवहेलना होउ नये ह्या संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ गोपालकृष्ण सीताफळे डॉ पुरुषोत्तम लड्डा प्रा किशोर चराटे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना देशासाठी बलिदान दिलेल्या स्वातंत्र्यवीरांची थोडक्यात माहिती दिली व आजच्या या रॅलीचे नियोजन कशासाठी आहे यासाठी सर्वांना मार्गदर्शन केले.महाविद्यालयाच्या वतीने देऊळगाव राजा शहरात यादरम्यान जनजागृती महा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते .या रॅलीच्या माध्यमातून विविध देशभक्तीपर घोषणा देण्यात आल्या. सुरुवातीला त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याकडे एक तिरंगा ध्वज देऊन रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यानंतर सदर ध्वज रॅली देऊळगाव राजा शहरात व व नगरपालिका परिसरातून तेथे उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करून रॅलीचे विसर्जन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रो. योगेश जाधव, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. शितल रघुवंशी, डॉ. गोपाळ सिताफळे, डॉ . लड्डा सर,प्रा. किशोर चराटे, प्रा. योगेश उबरहंडे , प्रा. गणेश पिंपळे, प्रो. अमोल गिरी सर.प्रो. जोगडे सर अल्हाट सर ,प्रा. कोल्हे सर ,प्रा. सुदर्शन उगले सर, प्रो. उमेश पिंपळे,प्रो. नारखेडे सर प्रो. खार्डे सर प्रो. डोणगावकर सर प्रो. डोंगरे सर, न महाविद्यालयातील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# हवेत गोळीबार करताच दरोड्याचा डाव फसला तीन जण पळून जाण्यात यशस्वी

## गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी | प्रतिनिधी

पहा दरोड्याच्या तयारीत आलेल्या सहा जणांनी घरचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करत सोनं-नाणे काढून द्या, आरडाओरड करू नका अशी धमकी देत हैदोस घातला होता. मारहाण करून सोने-नाणे चोरीला जाईल.या भितीपोटी घरमालकाने परवानाधारक रायफलमधून हवेत गोळीबार केला अन् दरोडेखोरांचा प्रयत्न अयशस्वी झाला. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तीन आरोपीच्या मुसक्या आवळल्या तर तिघे पळून जाण्यात यशस्वी झाले.याप्रकरणी सहा जणांविरुद्ध शुक्रवारी आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे आष्टी तालुक्यातील किन्ही व केरूळ परिसरात दरोड्याच्या घटना घडल्याने पोलिस ॲक्शन मोडवर आले होते.तर काही गावातील नागरिकांनी एकत्र येऊन गस्त सुरू केली.पोलिसही डोळ्यात तेल घालून दरोडेखोरांच्या मागावर होते.शुक्रवारी पहाटेच्या दरम्यान चोभानिमगांव येथील सतीश झगडे याच्या घरी कोयता, लोंखडी गज,गलवर,करवत घेऊन दरोड्याचा प्रयत्न करत असताना



त्यानी परवानाधारक रायफलमधून हवेत गोळीबार केल्याने अनर्थ टळला. आणि दरोडेखोर मोटारसायकलवरून सुसाट निघाले असता.भवरवाडी रस्त्यावर गस्तीवरील ग्रामस्थांनी यांना थांबवून हटकले.एवढ्यात यातील तिघेजण पळून जाण्यात यशस्वी झाले.तर पोलिसांना ही घटना समजाताच कसलाही विलंब न करता घटनास्थळी जाऊन तिघाजणांना ताब्यात घेतले व सतीश झगडे याच्या फिर्यादीवरून शुक्रवारी अहमदनगर जिल्ह्यातील रोहित शंकर मोरे,किरण गुलाब मोरे,अजय सुखदेव शिंदे,अक्षय पवार,विशाल बर्डे,गुलाब मोरे याच्यावर दरोड्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास आष्टीचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे करीत आहेत.

# पत्रकार महादेव हरण यांना महात्मा फुले समाज रत्न पुरस्कार जाहीर

लोकनेता न्यूज नेटवर्क

सेनगाव | प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथील एनटीव्ही न्यूज मराठीचे प्रतिनिधी महादेव हरण यांना नुकताच महात्मा फुले समाज रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे, सेनगाव तालुक्यातील निर्भीड पत्रकारीता करत असल्याने एनडीटीव्ही न्यूज मराठीचे मुख्य संपादक इकबाल शेख यांनी महादेव हरण यांना महात्मा



फुले समाज रत्न पुरस्कार जाहीर केला आहे हा पुरस्कार एनटीव्ही न्यूज मराठीच्या २२ व्या वर्धापन सोहळ्यामध्ये दिला जाणार आहे त्या अनुषंगाने १५ ऑगस्ट रोजी हिंगोली विधानसभेचे भारतीय जनता पार्टीचे आमदार तानाजी मुटकुळे यांनी सेनगाव शहरातील भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे पत्रकार महादेव हरण यांचा भव्य सत्कार केला आहे व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा ही दिली आहे यावेळी माजी आमदार रामराव वडकुते भाजपचे नेते रामदास पाटील सुमठाणकर व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## झाडे लावा झाडे जगवा

## चारोळी

मनाचं भिरभिरनं
कधीच थांबत नसतं
आटोकाट प्रयत्नानंतर त्याची
समाधी लागणं एखाद्यालाच जमतं.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# जिंतूर सेलू विधानसभा निवडणूक लढवणार शरद चव्हाण

लोकनेता न्यूज नेटवर्क

जिंतूर | पंकज चव्हाण

रिपब्लिकन सेना माझे जिल्हाध्यक्ष परभणी पश्चिम तथा जिंतूर पाटील विधानसभा अध्यक्ष प्रभारी मा शरद चव्हाण जिंतूर सेलू विधानसभा निवडणुकीत सक्रिय सहभाग घेऊन मतदार संघात दौरा सुरू केला आहे २०२४ विधानसभा निवडणुका लढवण्याची तयारी असून कामाला सुरुवात केली आहे शरद चव्हाण हे वयाच्या अठराव्या वर्षापासून जिंतूर तालुक्यात सक्रिय आहेत गोरगरिबांच्या वाली म्हणून आज पर्यंत त्यांनी निस्वार्थ जनतेची कामे केली व आज पण करीत आहेत तालुक्यात १०० च्या वर आंदोलन मोर्चा व जिंतूर तालुक्यातील सर्वात मोठी स्वाभिमानी बौद्ध धम्म परिषद मौजे अकोली येथे आयोजन करायचे त्यामुळे जिंतूर सेलू मतदार संघात प्रत्येक गावात त्यांचे नाव आहे समाजाचा हक्काचा माणूस म्हणून मा शरद चव्हाण यांच्याकडे समाज पाहतो ते पण दिवस रात्र कधी कोणीही फोन केला मग ते काम दवाखान्याची असो पोलीस स्टेशनची काम असो किंवा तहसील कार्यालय मध्ये काम असो त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी फार पुरवठा करत समाजाला न्याय मिळवून देत जिंतूर तालुक्यात त्यांची ओळख आहे रिपब्लिकन सेना पक्षाकडून निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे आंबेडकर समाजामध्ये आनंदाचे वातावरण आहे समाजात मिसळून समाजाचे प्रश्न सोडवणारान हक्काचा माणूस म्हणून ओळख आहे जिंतूर सेलू विधानसभा मतदान संघात त्यांची पकड मजबूत आहे.





# आष्टी येथील दुसऱ्या डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या संपर्क कार्यालयाचे भिमराव धोंडे यांच्या हस्ते उद्घाटन

## वाढती लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी सरकारने लोकसंख्या वाढ नियंत्रण कायदा लागू करावा-मा.आ.भिमराव धोंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

दिवसेंदिवस भारताची लोकसंख्या वाढत चालली आहे त्यामुळे भविष्यात अन्नधान्य,पाणीप्रश्न, महागाई,बेकारी,आरोग्यसेवा, शिक्षण यांसारख्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागेल,या समस्या निर्माण होऊ नयेत म्हणून सरकारने लोकसंख्यावाढ नियंत्रण कायदा लागू करावा म्हणजे लोकसंख्या वाढ आटोक्यात येईल असे मत माजी आमदार भिमराव धोंडे यांनी आष्टी येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन संपर्क कार्यालयाचे उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.






मराठवाड्यातील सर्वात मोठ्या व २९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या डॉ.स्वामीनाथन दुसऱ्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन संपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते झाले.प्रारंभी डॉ स्वामीनाथन यांच्या प्रतिमेची पुजा करण्यात आली.याप्रसंगी जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर,युवा नेते अभयराजे धोंडे,चेअरमन राजेश धोंडे,सरपंच सावता ससाणे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे,बाबु कदम,सदाभाऊ दिंडे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, माऊली बोडखे,प्राचार्य श्रीराम आरसुळ,प्राचार्य सुरेश बोडखे, एस.बी.आय.बँकेचे व्यवस्थापक राकेश साई,ग्रा.पं.सदस्य आदेश निमोणकर व इतर उपस्थित होते.पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की,लोकसंख्या वाढतच राहिली तर भविष्यात अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागेल यामध्ये अन्नधान्य,पाणीप्रश्न निर्माण होईल कारण पाऊस कधी आहे तर कधी नाही तसेच इतर अनेक समस्या निर्माण होतील यावर उपाय करण्यासाठी केंद्र सरकारने तज्ञांची समिती गठीत करावी त्यामध्ये प्रत्येक राज्यातील एका तज्ञांचा समावेश करावा.१९४७ साली भारत,पाकीस्तान, बांगलादेश,मॅनमार या सर्वांची मिळून लोकसंख्या ३२ कोटी होती.आज ७५ वर्षात फक्त भारताची लोकसंख्या सुमारे १५० कोटींवर पोहोचली आहे. इतर तीन देशांची मिळून २०० कोटी असु शकते आणखी पुढच्या ८० ते १०० वर्षात हीच लोकसंख्या ८०० ते ९०० कोटींवर जाऊ शकते.परंतु जमिनीचे क्षेत्र मात्र तेवढेच राहणार आहे.त्यामुळे भविष्यात अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.वाढत्या लोकसंख्येमुळे संपूर्ण देशाच्या यंत्रणेवर ताण येतो.वाढती महागाई,आरोग्य सेवा,शिक्षण,बेरोजगारी,गरीबी, भूकबळी असे बरेच प्रश्न उभे राहतात.वाढत्या लोकसंख्येमुळे सरकारच्या योजना प्रत्येकापर्यंत पोहोचणे देखील कठीण होते. कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन माहिती मिळते शेतीसाठी लागणारे नवनवीन अवजारे,जास्त उत्पन्न घेण्यासाठी नवनवीन माहिती अशा प्रदर्शनामधून मिळते. आज भारतात मोठ्या प्रमाणात अन्नधान्य उत्पादन होते त्यामुळे निर्यात देखील होते.भविष्यात लोकसंख्या प्रचंड वाढल्यास अन्नधान्य टंचाई निर्माण होऊ शकते या करीता शेती तज्ञांनी प्रचंड प्रमाणात उत्पादन देणाऱ्या नवनवीन पिकांच्या जातींचे संशोधन करावे.कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून प्रदर्शन पाहुन प्रत्येक वर्षी १० ते २० टक्के शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती केली तरी शेतकरी प्रगतीशील होईल.डॉ स्वामिनाथन यांनी शेतकऱ्यांच्या मालाला जास्तीचा भाव कसा देता येईल यासाठी प्रयत्न केले.त्यांनी शेतीसाठी भरीव कार्य केले.कृषी प्रदर्शनात,१५० ते २०० कृषिविषयक स्टाल व १५०० हुन अधिक उत्पादने तसेच खाऊ गल्लीची दुकाने सहभागी होणार असून शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञाना ची माहिती मिळणार आहे.या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून उत्पादकांना थेट ग्राहकापर्यंत पोहोचवत अल्प दरात आपली उत्पादने व सेवा लाखों ग्राहकापर्यंत पोचवता येणार आहे.शेतकरी बांधवानां मोफत या प्रदर्शनाचा लाभ घेता येणार आहे.कृषी मंत्री व पालकमंत्री धनंजय मुंडे,भाजपाच्या नेत्या आ.पंकजाताई मुंडे,आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे तर समारोप अ.भा. वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.चार दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनाचा शेतकऱ्यांनी लाभ घेऊन आपल्या शेतीसाठी उपयोग करावा असे आवाहन मा. आ.भिमराव धोंडे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्रीराम आरसुळ यांनी केले याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी सांगितले की,कृषी प्रदर्शन हे शेतकऱ्यांसाठी वरदान आहे याचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.अशा प्रकारच्या प्रदर्शनामधून शेती संबंधात आधुनिक माहिती मिळते.एस. बी.आय.बँकेचे व्यवस्थापक राकेश साई, संयोजक बंडू पाचपुते यांची भाषणे झाली.कार्यक्रमास परिसरातील शेतकरी,छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे विद्यार्थी,शिक्षक व इतर उपस्थित होते.आभार प्रा. एम आय तांबोळी यांनी मानले.

# पाटोदा तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.सिताराम नागरगोजे तर सचिवपदी ॲड.अशरफ सय्यद यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा तालुका वकील संघाच्या नुतन कार्यकारिणीची निवड नुकतीच बिनविरोध करण्यात आली. या वेळी पाटोदा तालुका वकील संघाच्या अध्यक्षपदी अँड.सिताराम नागरगोजे यांची तर सचिवपदी अँड.अशरफ सय्यद व उपाध्यक्ष अँड.बाळासाहेब लवुळ यांची निवड झाली आहे. तर कोषाध्यक्ष म्हणून अँड.अजित थोरवे, ग्रंथपाल प्रतिनिधी म्हणून अँड.अविनाश जगदाळे, महिला प्रतिनिधी म्हणून अँड.शैलजा गर्जे यांची निवड करण्यात आली. पाटोदा तालुका वकील संघाच्या नुतन कार्यकारणीची निवड करण्यासाठी दिनांक-१४/०८/२०२४ रोजी पाटोदा न्यायालयातील वकील संघाच्या कार्यालयात मावळते अध्यक्ष अँड.सुशील कोठेकर, सचिव अँड.सचिन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या प्रसंगी पाटोदा वकील संघाने बिनविरोध निवडीची परंपरा कायम ठेवत अध्यक्षपदी अँड.सिताराम नागरगोजे, सचिवपदी अँड.अशरफ सय्यद, उपाध्यक्षपदी बाळासाहेब लवुळ, कोषाध्यक्ष अजित थोरवे, ग्रंथपाल प्रतिनिधी अँड.अविनाश जगदाळे, महिला प्रतिनिधी अँड.शैलजा गर्जे यांची निवड करण्यात आली. या निवडीला सर्व वकील संघातील सदस्यांनी बिनविरोध पाठिंबा दिला. निवडी नंतर नुतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत करुन शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी विधिज्ञ अँड.एन.जी. जाधव, अँड.यु.बी.जाधव, अँड.बी.डी.तळेकर, अँड.एम.व्ही.जाधव, अँड.घुले, अँड.जब्बार पठाण, अँड.दिलीप पारगावकर, अँड.ए.एम.जगदाळे, अँड.सुशील कोठेकर, अँड.सचिन जावळे, अँड.वारे, अँड.पांडव, अँड.अमरीश वैद्य, अँड.तात्यासाहेब पवार, अँड.विलास पवार, अँड.तुषार जाधव, अँड.विशाल मस्के, अँड.चौरे, अँड.ऋषिकेश डबीर, अँड.महेश बेदरे, अँड.श्वेता राख, अँड.दिपाली पांडव यांच्या सह विधीज्ञांची उपस्थिती होती.

# प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांना लोकशाही आरोग्यरत्न पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी,माजी खासदार व आमदार डॉ. केशवरावजी धोंडगे साहेबांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ लोहा-कंधार तालुक्यातील प्रत्येक गाव,वाडी,तांडा व शहरातील वयोवृद्ध व्यक्तींच्या डोळ्याचे शिबिर आयोजित करुन मोफत शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेऊन अंधमुक्तीचा संकल्प केला. ३ हजार लोकांच्या डोळ्यांची यशस्वी शस्त्रक्रिया पहिला टप्पात पार पडली.

प्रत्येक शिबीरासाठी गावागावांत प्रा.धोंडगे व त्यांची पत्नी मनिषाताई धोंडगे उपस्थित होत्या. पुरुषोत्तम धोंडगे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकशाही न्युजचॅनलच्यावतीने आरोग्यरत्न सन्मान २०२४ हा पुरस्कार मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या हस्ते दि.१४ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला.

प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे यांच्या नेतृत्वाखाली श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्यावतीने कोरोना काळात कंधार-लोहा तालुक्यांतील सरकारी आणि खासगी डॉक्टरांना पिपीई किटची सुविधा उपलब्ध करून दिली.कोरोना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी 'भाऊचा डब्बा ' हा उपक्रम सुरू करून सामाजिक बांधिलकी जोपासली.गेल्या ३ वर्षापासून भाऊचा डब्बा हा उपक्रम अविरत सुरू आहे.कोरोना आजाराने जीव गमावलेल्यांच्या मुलांना दत्तक घेऊन त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली.कंधारव लोहा तालुक्यातील ३ हजार वयोवृद्धावर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली.या सर्व बाबींची दखल घेऊन लोकशाही न्यूज चॅनलच्या वतीने प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांना दिलेल्या पुरस्कारामुळे कंधार-लोहा तालुक्यात त्यांचे कौतूक होत आहे.

# भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त धर्मभूषण ॲड.ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

## अनाथ मुलांना व सुरक्षा रक्षकांना छत्र्या वाटप करून कृपाछत्र उपक्रमांचा शुभारंभ करून आगळ्या वेगळ्या प्रकारे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



गेल्या अनेक वर्षांपासून अनाथाश्रम आणि इंटेलिजन्स सेक्युरिटी सर्विसेस येथे ड.ठाकूर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येते.अनाथ मुलांना मदत म्हणून दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून भाजप महानगर नांदेड तसेच लायन्स क्लब नांदेड सेंट्रल च्या तर्फे लहुजी साळवे बालकाश्रम येथे विविध उपक्रम राबविण्यात येतात. यावर्षी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हैदराबाद येथील सुप्रसिध्द समाजसेविका स्नेहलता जयस्वाल यांनी भूषविले. याप्रसंगी भाजपा कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट, लायन्स क्लब नांदेड सेंट्रलचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील, दानशूर नागरिक अशोक पडगिलवार,अरुण काबरा, सुरेश शर्मा, राजेशसिंह ठाकूर,सविता काबरा, प्रा. वर्षा कुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला संस्थेचे सचिव लालबाजी घाटे यांनी प्रास्ताविक करताना गेल्या अनेक वर्षापासून दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून अनाथ विद्यार्थ्यांना नेहमी मदत मिळत असल्याचे सांगितले. यानंतर दिलीप ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना असे सांगितले की, कृपाछत्र उपक्रमाच्या पाचव्या वर्षी सफाई कामगार, वृद्धाश्रम, अनाथाश्रम, वृत्तपत्र विक्रेते, रस्त्यावरील बेघर यांना २०२४ छत्र्या वाटप करण्यात येणार आहेत.आता पर्यंत २५८ छत्र्यांसाठी देणगीदार मिळाले आहेत.त्यामध्ये धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांच्यातर्फे ५० तर हॉटेल मिडलँड गोकुळनगर नांदेड व स्नेहलता जायसवाल हैदराबाद यांच्यातर्फे प्रत्येकी ३२ छत्र्या मिळाल्या आहेत. प्रत्येकी १६ छत्र्या देणाऱ्या मध्ये प्रमिला महेश भालके, डॉ. गोविंद भाकरे,एक राम भक्त,अशोक विठ्ठलराव पडगीलवार,
रुहिका रूपेश मुत्तेपवार, सुरेश शंकरराव पळशीकर,आनंद सिताराम साताळे, ला. शिवाजीराव पाटील,मोहित व रेणुका सोनी यांचा समावेश आहे. सर्व देणगीदारांच्या हस्ते छत्र्याचे वाटप करण्यात येत आहे. यावेळी पुढे बोलताना ठाकूर असे म्हणाले की,नियतीने अनाथ मुलांवर अन्याय केला असल्यामुळे जे नागरिक सुस्थितीत आहेत त्यांनी या अनाथाश्रमाला सहकार्य करावे असे आवाहन केले.या प्रसंगी सुरेश लोट,स्नेहलता जयस्वाल,सविता काबरा,राजेशसिंह ठाकूर, सुरेश शर्मा, प्राध्यापिका कुटे, शिवाजीराव पाटील यांची समयोचित भाषणे झाली. संस्थेच्या अध्यक्षा रेखा घाटे यांनी सर्वांचा सत्कार केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अधिक्षक ज्ञानेश्वर भांडवले यांनी तर आभार नंदकुमार गायकवाड यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काळजी वाहक मिना गायकवाड,प्रतिभा जाधव,भुंजग नामपल्ले शिवाजी पवळे, सत्यभामा पवळे यांनी परिश्रम घेतले.

इंटेलिजन्स सेक्युरिटी सर्विसेस येथे झालेल्या स्वातंत्र दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ स्वयंसेवक अरूण बापू किनगावकर हे होते.सुरुवातीला व्यवस्थापकीय संचालक शेखर भावसार यांच्या हस्ते दिलीप ठाकूर व इतर अतिथींचा सत्कार करण्यात आला.यावेळी बोलताना दिलीप ठाकूर यांनी ऊन, पाऊस ,थंडीची तमा न बाळगता चोख कामगिरी बजावणाऱ्या सुरक्षा रक्षकांना छत्र्या देणार असल्याची घोषणा केली. किनगावकर यांनी समायोचित मार्गदर्शन केले.याप्रसंगी भास्कर अत्रे,अप्पा ध्याडे,राजेशसिंह ठाकूर,श्रीपाद पोरवाल, बालाजी वाकोडे, रामेश्वर जाधव,राजेन्द्र ताटे,जयप्रकाश क्षीरसागर,प्रकाश बोकारे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख अब्दुल,संदीप ठाकूर,ज्योती गायकवाड,सोनाली वाघमारे,कुमार मॅडम, तस्लिम,सूर्यवंशी,रमेश शिंदे, ज्योत्स्ना मॅडम,राजकिशोर ठाकूर, पतंगे मॅडम, सुनिता देशमुख,पंडित पांचाळ यांनी परिश्रम घेतले.दिलीप ठाकूर व त्यांच्या टीमने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अनाथ मुलांना व सुरक्षा रक्षकांना छत्र्या वाटप केल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# वंजारी महासंघ पुरस्कृत अहिल्यानगर येथे दुसऱ्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात प्रतिभावंतांचा गौरव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

संत सद्गुरू अवजीनाथ महाराज संत सद्गुरू वामन भाऊ महाराज संत सद्गुरू जगद्विख्यात तत्वज्ञानी थोर प्रबोधनकार समाजसुधारक राष्ट्र संत भगवानबाबा भागवत धर्म वैश्विक पातळीवर पोहचवणारे सद्गुरू ह भ प डॉ नामदेव शास्त्री महाराज भगवानगड ह भ प विठ्ठल महाराज गहिनीनाथ यांच्या कृपा आशिर्वादाने अहिल्या नगर या ठिकाणी होणाऱ्या या अभुतपुर्व ऐतिहासिक सोहळयात अनेक साहित्य क्षेत्रातील दिग्गज ज्यांच्या कार्याचा ठसा राष्ट्रीय पातळीवर उमटला आहे त्यांना जगद्विख्यात तत्वज्ञानी थोर प्रबोधनकार समाजसुधारक राष्ट्र संत भगवानबाबा साहित्य रत्न पुरस्कार २०२४ देऊन दिनांक २५,/८/२०२४रविवार गंगा लान्स संत भगवानबाबा चौक निर्मल नगर अहिल्या नगर अहमदनगर येथे गौरविण्यात येणार. त्या अनुषंगाने सत्कारमूर्ती यांच्या नावाची घोषणा वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष सुप्रसिद्ध विचारवन्त तथा साहित्यिक मा.गणेश खाडे यांनी एका पत्रकान्वये केलीय.

सदर पुरस्कार कथा,कविता व समीक्षा या साहित्य प्रकारात दमदार वाटचाल व साधना करणाऱ्या समाजातील प्रतिभावंतांना देण्यात आला असून संमेलन पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष तथा महासंघाचे मार्गदर्शक सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी पुरस्कार प्राप्त साहित्यिकांच्या नावाचा निर्देश पुढील प्रमाणे केला आहे.

१)प्रा.डॉ.शिवाजीराव हुसे- छ.संभाजीनगर
२)प्रा.डॉ. शिवाजीराव नागरे- अकोला
३)प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये- परभणी
४)श्री.चंद्रकांत धस-पुणे
५)श्रीमती रेखा शेळके संखे-मुंबई
६)प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे-छ.संभाजीनगर
७)प्रा.डॉ.द्वारका मुंडे-नांदुरघाट जि. बीड
८)श्रीमती रंजना सानप-मायणी जि. सातारा
९)श्री.सोपान हळमकर-बीड
१०)श्री.मनोहर आंधळे -चाळीसगाव जि. जळगाव
११)श्री.तुळशीराम बोबडे -अकोला
१२)श्रीमती अलकनंदा घुगे आंधळे -छ.संभाजीनगर
१३)श्री.रमेश आव्हाड-नाशिक
१४)श्रीमती प्रीती बेटकर-पुणे
१५)श्रीमती जयश्री वाघ-नाशिक
१६)श्रीमती छाया वाघ जायभाये-जालना

सर्व पुरस्कारार्थीचे वंजारी महासंघ पदाधिकाऱ्यांच्यावतीने व निवड समितीच्यावतीने अभिनंदन. सदर संमेलन यशस्वी करण्यासाठी स्वागत अध्यक्ष तथा अंतरराष्ट्रीय कुस्ती पटू राजकुमार आघाव सह स्वागत अध्यक्ष रेणुकताई वराडे सह स्वागत अध्यक्ष घनश्याम बोडखे निमंत्रक मल्हारी खेडकर जिल्हा अध्यक्ष अहिल्या नगर युवक जिल्हाध्यक्ष अर्जुन वायभासे हे प्रयत्नशील आहेत.

## विदेशात असणाऱ्या भारतीय मुलींनो हात जोडून विनंती भारतात येऊ नका-ईन्फलूएन्सर तान्या खनीजो

# महिला डॉक्टर अमानुष हत्येच्या निषेधार्थ (एस,आर, टी,) ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे मार्ड संघटनेच्या वतीने तत्कालीन संपाचा आज चौथा दिवस

## महाराष्ट्र राज्य परिचारिका अंबाजोगाई सेवा संघाचा या संपाला पाठिंबा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**





भारतातली लोकप्रिय ईन्फलूएन्सर तान्या खानीजोने आपल्या पोस्ट मध्ये देशातील महिलांच्या सुरक्षेबाबत चे वाजले तीन तेरा असे वक्तव्य करत विदेशात राहणाऱ्या मैत्रीणीनो मी आव्हान करते कि विदेशात च रहा अशी विनंती केली आपल्या देशातील महिला सुरक्षेचा प्रश्न अतिशय गंभीर बनलेला असून सुरक्षित वातावरण निर्माण होत नाही, आपलं भारत सरकार त्या विषयी गांभीर्याने ठोस पाऊल उचलत नाही तो पर्यंत काहीही झालं तरी भारतात येऊ नका असे म्हणण्याची वेळ भारतीय महिलेवर आली,बलात्कार व हत्या करणाऱ्या नराधमास कठोर सजा होत नसून अशा घटना वारंवार वाढत जात आहेत देशातील महिलाचे जीवन भयभीत झाले आहे, भारत सरकार याकडे गांभीर्याने लक्ष घालत नाही,या संपामुळे ग्रामीण रुग्णालयातील रुग्णाची हेळसांड पाहावयास मिळत आहे,कोलकाता येथील सरकारी रुग्णालयात निवासी महिला डॉक्टरचा बलात्कार करून तिची हत्या केल्याची घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण देश हादरला असून . दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यातील डठढ वैद्यकीय महाविद्यालयातील च-ठऊ संघटनेचे पदाधिकारी दि १३,ऑगस्ट पासून बेमुदत संपावर गेले आहेत. बलात्कार व खून या घटनेच्या निषेधार्थ बीड जिल्ह्यातील स्वामी रामानंद तीर्थ (एस,आर, टी,) महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालय येथे तत्कालीन संपाची हाक आपल्या सहकारी रेसिडेंट डॉक्टर वर झालेल्या अति भयानक लैंगिक अत्याचार निर्दयी हत्या च्या विरोधात शोक व संतापाने एकत्र येऊन आपल्या सहकाऱ्यावरील अमानुष घटनेचा निषेध नोंदवत या घटनेचे इतरत्र पडसाद आता उमटू लागले आहेत .

कोलकाता प्रकरणात केंद्रीय यंत्रणेकडून निष्पक्ष आणि पारदर्शक तपास करावा, तसेच यातील आरोपींना अटक करून कठोर शिक्षा द्यावी,व न्याय मिळेपर्यंत आम्ही सर्व गैरतात्कालीन सेवा बंद ठेवत आहोत,अशी मागणी च-ठऊ संघटना सध्या करत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील बहुतांश आजपासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे.

कोलकाताच्या महिला डॉक्टरवरील अत्याचाराच्या निषेधार्थ आज राज्यभरात या घटणेचे पडसाद उमटताना दिसत आहेत.

अत्यावश्यक सेवा वगळता आजपासून दि,१३,काम बंद आंदोलन पुकरण्यात आले आहे.आज चौथा दिवस आहे

आज निदर्शने देत बंद पुकारला गेला . घोषणा देत रुग्णालय परिसरात रॅली काढण्यात आली,या प्रकरणात केंद्रीय यंत्रणेकडून निष्पक्ष आणि पारदर्शक तपास करावा, तसेच यातील आरोपींना अटक करून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी च-ठऊसंघटनेनी केली आहे.

आरोपींना अटक करून कठोर शिक्षा द्यावी ! या मागणीवर च-ठऊ संघटना ठाम आसल्याचे म्हटले आहे , या काम बंद ला अंबाजोगाई येथील( डठढ)वैद्यकीय शासकीय महाविद्यालयातील महाराष्ट्र राज्य परिचारिका सेवा संघ अंबाजोगाई यांचा या निर्दयी घटनेचा तीव्र निषेध करत पाठिंबा देण्यात आला आहे, कोलकाता येथे महिला निवासी डॉक्टर वरील लैंगिक अत्याचार व निर्दयी खून प्रकरणी देशव्यापी संपात अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील निवासी डॉक्टरांनी सहभाग घेतला त्याला आज इंडियन मेडिकल असो सिएशनच्या व अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन च्या पदाधिकाऱ्यांनी भेटून पाठिंबा देत निषेध व्यक्त केला. यामध्ये डॉ नवनाथ घुगे, डॉ राजेश इंगोले, डॉ राहुल धाकडे, डॉ अरुणा केंद्रे, डॉ बर्दापूरकर, व इतर सदस्य उपस्थित होते.

निवासी डॉक्टरांच्या या आंदोलनाचा चौथा दिवस असून सर्व निवासी डॉक्टर सहभागी झाले आहेत. बंगाल मधील मुख्य आरोपींना वाचवण्यासाठी तेथील सरकार चालढकल करत असल्याचा आरोप येथील निवासी डॉक्टर करत आहेत . यावेळी डॉ राहुल मुंडे, डॉ गौरव शिसोदे, डॉ शिवानी, डॉ तेजस व सर्व निवासी डॉक्टर उपस्थित होते. मार्ड च्या आंदोलनात संपूर्ण ताकदीने सर्व खाजगी डॉक्टर्स असल्याचे म्हटले आहे, डॉ नवनाथ घुगे, डॉ राजेश इंगोले व डॉ राहुल धकदे यांनी निवासी डॉक्टरांची रॅली काढत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.फांसी दो फांसी दो, हत्यारो को फांसी दो, वुई वॉन्ट जस्टिस, सुरक्षा हमारा अधिकार है अशा घोषणांनी .(SRT ) स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय ग्रामीण रुग्णालय परिसर दणाणून गेला होता.

## इंदापूरमधील प्रत्येक कुटुंबामध्ये

# विकास पोहोचण्यासाठी नोकरी महोत्सवा ला महत्व-माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**




जिजाऊ फेडरेशनच्या वतीने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये शुक्रवार दि.१६ ऑगस्ट रोजी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या नोकरी महोत्सवाचे उद्घाटन माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अंकिता पाटील- ठाकरे,युवा नेते राजवर्धन पाटील,महाराष्ट्र राज्य टी.पी.ओ.चे अध्यक्ष डॉ.शितल कुमार रवंदळे उपस्थित होते. रेड्डी फाऊंडेशन,बजाज ऑटो,टाटा मोटर्स, भारत गियर्स,डूथ ऑटोमेटिव्ह,क्सिस बँक,मुटूथ फायनान्स,एलआयसी,रॉयल इन्फोटेक,जिनियस कन्सल्टंट,आर ३५ सिक्युरिटीज अर्णव इन्फो यासारख्या ७७ कंपन्या आणि त्यांचे मानव संसाधन विभाग अधिकारी,सी ईओ,व्यवस्थापकीय संचालक नोकरी महोत्सवामध्ये सहभागी झाले.भिगवण,बावडा,इंदापूर या ठिकाणी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीच्या माध्यमातून १२०० युवक - युवतींनी ऑनलाईन रजिस्टर करून या नोकरी महोत्सवामध्ये सहभागी झाले होते. डॉ.शितलकुमार रवंदळे यांची महाराष्ट्र राज्य टी पीओ च्या प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.हर्षवर्धन पाटील म्हणाले की,इंदापूर तालुक्यातील युवा वर्गाला रोजगार संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने जिजाऊ फेडरेशनने भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन केले आहे.अनेक युवक हुशार, गुणवंतधारक कौशल्यधिष्ठीत असतात मात्र युवकांना रोजगारासंबंधी योग्य असे व्यासपीठ (प्लॅटफॉर्म) मिळत नाही.जिजाऊ फेडरेशनने गरजू युवा वर्गाला ही संधी उपलब्ध करून दिली आहे. इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ इंदापूर,एस. बी.पाटील इन्स्टिट्यूट वनगळी तसेच श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी बावडा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून दरवर्षी २४ ते २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या विद्यार्थ्यांना आपल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावेत यासाठी अनेक कंपन्या,उद्योग,व्यवसायिक जगताशी संपर्काच्या माध्यमातून ही संधी त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत.'

अंकिता पाटील- ठाकरे म्हणाल्या की, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून काम करताना तसेच तालुक्यामध्ये संपर्क साधताना बेरोजगाराची समस्या दिसून आली यातून मार्ग काढण्यासाठी रोजगार मिळावे महत्त्वपूर्ण ठरतील या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन केले आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे यांनी केले.यावेळी जी.आर.बी सोल्युशन पुणे चे संचालक गुरुदेव अलुरकर,नानक जाधव तसेच संस्थेचे संचालक सुरेश मेहेर,रघुनाथ राऊत,प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज,प्राचार्य डॉ.लहू वावरे,उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.फिरोज शेख यांनी केले.आभार इंदापूर महाविद्यालयाचे टी पी ओ प्रमुख डॉ.सदाशिव उंबरदंड यांनी मानले.

# वृक्षारोपण ही आजच्या काळाची गरज सामाजिक कार्यकर्ते सावळेराम आबा बळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



तालुक्यातील जोगेश्वरी पारगांव येथे रघूनाथ विश्वनाथ पठाडे आणि प्रयागाबाई बाप्पूराव मोकाशे यांच्या स्मरणार्थ स्मशान भूमीत वृक्षारोपण करण्यात आले.पाण्यात राख टाकून प्रदुषण खराब करण्यापेक्षा त्या व्यक्तीच्या नावे खड्डा खोदून त्याच्यात राख टाकून वृक्ष लावणे हा स्तुत्य उपक्रम पारगांव ग्रामस्थांनी सुरू केला आहे.अशी माहीती सामाजिक कार्यकर्ते सावळेराम आबा बळे यांनी दिली आहे.

वातावरणात सातत्याने बदल होत आहे त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे. पर्यावरणाचा प्रश्न सर्व जगाला भेडसावत आहे.पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन ही आजच्या काळाची मोठी गरज आहे.

कोरोणा काळामध्ये रुग्णांना हॉस्पीटलमध्ये डमीट करण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती.ऑक्सिजनचा साठाही पुरेसा नव्हता म्हणुन येणाऱ्या काळात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे तसेच ग्रामपंचायतने देखील वृक्षारोपण लागवडीसाठी पुढाकार घ्यावा असेही सावळेराम आबा बळे यांनी शेवटी सांगितले.यावेळी बाप्पू मोकाशे,संतोष बळे,नारायण भोराडे,आबा पठाडे,बाप्पू भोराडे,शरद मोकाशे,बारकू साळवे बाळु महाराज मोकाशे आदी सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

# विधानसभेसाठी उदया व परवा विशेष मतदार नोंदणी अभियान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

विधानसभा निवडणुकीसाठी ज्या अठरा वर्षावरील नागरिकांचे नाव मतदान यादीत नसतील किंवा ज्यांच्या घरी कोणी मृतक झाले असेल तर त्यांचे नाव वगळण्यासाठी उद्या शनिवार १७ ऑगस्ट व रविवार १८ऑगस्ट रोजी विशेष मतदार नोंदणी अभियान संपूर्ण जिल्ह्यात व लोहा तालुक्यात राबविले जात आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

जिल्ह्यामध्ये मतदार प्रारूप यादीचे दुसरे पुननिरीक्षण अभियान ६ ऑगस्ट पासून सुरू झाले आहे. नागरिकांसाठी शनिवार व रविवार या दोन सुट्ट्यांच्या दिवशी विशेष मतदान नोंदणी अभियान गेल्या दि. १० व व दिनांक ११ ऑगस्ट रोजी राबविण्यात आले होते.या शिवाय चालू आठवड्यात दि. १७ व १८ ऑगस्ट रोजी हे अभियान राबविण्यात येणार आहे.मतदार यादीमध्ये आपले नाव नसेल तर नोंदणी करण्यासाठी २० ऑगस्ट शेवटची तारीख आहे. विधानसभेमध्ये मतदान करण्यासाठी आपली नावे मतदान यादीत आहे, हे माहिती करून घेण्यासाठी तसेच आपल्या हरकती व दावे नोंदविण्यासाठी २० ऑगस्टपर्यंत संधी आहे. ३० ऑगस्टला ही प्रक्रिया पूर्ण होणार असून त्यानंतर अंतिम होणाऱ्या यादीतील मतदारांनाच विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान करता येणार आहे.याची नोंद घ्यावी, असे आवाहन तहसीलदार विठ्ठल परळीकर, नायब तहसीलदार निवडणूक संजय भोसीकर, केले आहे.नांदेड जिल्ह्यातील किनवट,हदगाव,भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, लोहा, नायगाव, देगलूर व मुखेड या नऊ विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी उद्या मतदार केंद्रावर उपलब्ध असणाऱ्या बीएलओकडून अर्ज भरून घ्यावेत असे आवाहन तालुका प्रशासनाने केले आहे.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायमस्वरूपी सुरु राहणार-ना.संजय बनसोडे

## महिलांनी बँक खात्याला आधार क्रमांक जोडण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**



उदगीर येथे राज्य शासनाने गरजू महिला-भगिनींना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेची रक्कम लाभार्थी महिलांच्या थेट खात्यावर जमा होण्यास सुरुवात झाली असुन प्रत्येक पात्र महिलेला या योजनेचा लाभ मिळणार व ही योजना कायमस्वरूपी अशीच सुरु राहणार असल्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आज सांगितले. तसेच योजनेबाबत पसरविण्यात येणाऱ्या गैरसमाजावर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची नावनोंदणी करणारे अधिकारी, यासाठी गावपातळीवर काम करणाऱ्या उदगीर, जळकोट तालुक्यातील आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, बचतगटातील महिला आदी कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा आणि मार्गदर्शन मेळाव्यानिमित्त उदगीर तालुक्यातील कौळखेड येथील शिवम फंक्शन हॉल येथे आयोजित कार्यक्रमात ना. संजय बनसोडे बोलत होते.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, उदगीरचे गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गट विकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांच्यासह राजकीय पक्षाचे पदाधिकारी , अधिकारी, व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

महिलांना दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच वर्षाला १८ हजार रुपयांचा लाभ देण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी अर्ज भरून घेण्यासाठी अंगणवाडी सेविका आणि पर्यवेक्षिका, आशा कार्यकर्ती, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्य महिलांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यामुळे उदगीर आणि जळकोट तालुक्यातील पात्र महिलांची मोठ्या प्रमाणात ऑनलाईन नोंदणी झाली आहे. त्यामुळे नाव नोंदणीसाठी काम करणाऱ्या प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांच्या कामाची दखल घेवून त्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आल्याचे ना. संजय बनसोडे यांनी सांगितले.

पात्र महिलांच्या खात्यावर ' मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्याचे एकत्रित तीन हजार रुपये अनेक महिलांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. उर्वरित पात्र महिलांच्या खात्यावरही लवकरच लाभाची रक्कम जमा होणार आहे. या योजनेसाठी अर्ज केलेल्या काही महिलांच्या अर्जात त्रुटी असल्याने ते अर्ज दुरुस्तीसाठी परत पाठविण्यात आले आहेत. तसेच काही महिलांच्या बँक खात्याला आधार क्रमांक जोडले नसल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे अशा महिलांनी लवकरात लवकर आपल्या अर्जातील त्रुटींची दुरुस्ती करावी. ज्या महिलांच्या बँक खात्याला आधार जोडलेले नाही, अशा महिलांनी आपल्या बँकेत जावून बँक खात्याला आधार क्रमांक जोडून घ्यावा, असे आवाहन ना. बनसोडे यांनी केले.

उदगीर येथे एमआयडीसी मंजूर करण्यात आली असून याठिकाणी मोठे उद्योग सुरु होवून युवकांसाठी रोजगार उपलब्ध होतील. तसेच तालुक्यातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणाचे काम गेल्या पाच वर्षात करण्यात आले आहे. रस्त्याच्या विकासामुळे दळणवळण सुविधा गतिमान झाल्याचे ना. बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपस्थित असलेल्या महिलांनी ना. बनसोडे यांना राखी बांधून त्यांचे औक्षण केले. तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रकम बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याबद्दल आभार मानले. ना. बनसोडे यांच्या हस्ते अंगणवाडी सेविका, आशा सेविका, महिला बचतगटाच्या सीआरपी, अध्यक्ष आणि सदस्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित पदाधिकारी, अधिकारी आणि महिलांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

# मंजूर कामाचेच नारळ मी फोडतो मंजुरीच्या अगोदर नारळ फोडण्याची सवय आम्हाला नाही–आ.बाळासाहेब आजबे यांचा विरोधकांना टोला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने वेगवेगळ्या लोक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत या योजना प्रत्येक गावामध्ये सामान्य जनतेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे त्याचबरोबर गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत आपण गावात केलेली विकासकामाचे लोकार्पण व मंजूर कामांचे उदघाटन करणे व ही कामे जनतेला माहिती व्हावेत या उद्देशाने हा गाव भेट दौरा सुरू आहे परंतु विरोधकांकडून मी करत असलेल्या मंजूर कामांच्या उद्घाटनाबाबत टीका केली जात आहे,मला विरोधकांना एवढेच सांगायचे आहे की मी मंजूर केलेल्या कामाचेच नारळ फोडतो मंजुरीच्या अगोदर नारळ फोडण्याची सवय आम्हाला नाही, विरोधकांनी१० वर्षापूर्वी विकास कामाच्या नावाखाली गावागावात अनेक नारळ फोडली त्या कामांचे काय झाले हे जनतेला सांगावे असा टोला आमदार बाळासाहेब आजबे यांनी नाव न घेता पाटोदा तालुक्यात गाव भेट दौऱ्या दरम्यान बोलताना विरोधकांना लगावला आहे.

गेल्या पाच वर्षाच्या कारकीर्दीमध्ये आपण मतदारसंघांमध्ये मूलभूत गरजा लक्षात घेता शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असणारा पाणी ,रस्ते विजेचा प्रश्न प्रामुख्याने हाताळत तो कसा सोडवता येईल यासाठी प्राधान्यानेअनेक गावांमध्ये १६० कोटी रुपयांचे बंधाऱ्याची कामे मंजूर केली आहेत तर पांदण रस्ता योजनेच्या माध्यमातून ५०० पेक्षा जास्त रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावला आहे त्याचबरोबर इतर विकास कामे मोठ्या प्रमाणात केली असल्याचे आमदार बाळासाहेब आजबे यांनी गाव भेट दौऱ्या दरम्यान बोलताना सांगितले.

आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे यांचा गाव भेट दौरा सध्या सुरू असून शुक्रवार दिनांक १६ ऑगस्ट रोजी येवलवाडी नागरगोजे सावरगाव सोने सोनेगाव सौंदाना वैद्यकिन्ही मेंगडेवाडी या ठिकाणी त्यांनी ग्रामस्थांची भेटी देऊन ग्रामस्थांची चर्चा केली यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष दिपक दादा घुमरे,बाबासाहेब शिंदे, बाबासाहेब जाधव,अंगद भोंडवे, शिवाजी नेमाने,सुरेश शिंदे,भीमराव बांगर,भगवान शिंदे,अंगद घुमरे,हनुमान शिंदे, राजाभाऊ कदम,भागवत रंजवन यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी पुढे बोलताना आमदार आजबे म्हणाले की आष्टी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात जाऊन आपण पाच वर्षात केलेली कामे त्या कामांचे लोकार्पण व उद्घाटन करून ती कामे लोकांपर्यंत पोहोचण्याचे काम या दौऱ्याच्या निमित्ताने केली जाणार आहे, त्याचबरोबर शासनाने ज्या लोक कल्याणकारी योजना जाहीर केल्या आहेत त्या योजनांची माहिती ग्रामस्थांच्या भेटी गाठी घेण्यासाठी व गावात झालेल्या कामांची



माहिती लोकांना व्हावी म्हणून हा दौरा आयोजित केला आहे लाडकी बहीण योजना,सौर पंप योजना ,मोफत गॅस योजना , मुलींसाठी मोफत शिक्षण योजना यासारख्या शासनाच्या लोक कल्याणकारी योजनांचा जनतेने लाभ घ्यावा व कार्यकर्त्यांनी ही योजना त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे काम करावे शेतकऱ्यांनी कापूस व सोयाबीन पिकांचा पीक पेरा लावून घ्यावा जेणेकरून हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान मिळण्यास मदत होईल, गेल्या पाच वर्षांमध्ये आपण कोणाचे वाईट होईल असे कोणतेही काम केले नाही, आमदार हा लोकांच्या समस्या सोडण्यासाठी असतो समस्या निर्माण करण्यासाठी नसतो म्हणून पाच वर्षाच्या काळात आपण भावाभावात किंवा गावागावात भांडण लावण्याचे काम केले नसून आपसातील भांडणे मिटवण्याचे प्रामाणिक काम केले आहे म्हणून गेल्या पाच वर्षांमध्ये तालुक्यामध्ये शांतता नांदत आहे, आपण गेल्या साडेचार वर्षाच्या कार्यकाळात मतदार संघात जवळपास तीन ते साडेतीन हजार कोटी रुपयांची विविध विकासकामे मंजूर करून आणून ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत त्यामुळे मतदारसंघातील गाव,वाडी ,वस्ती या प्रत्येक ठिकाणी विकास कामे झालेली आहेत कोणत्याही कामांमध्ये अनिमित्त झालेली नसून लोकांना विकास कामे दिसत असल्यामुळेच लोकांचा पाठिंबा आपल्याला मिळत असल्याचेही आमदार बाळासाहेब आजबे यांनी यावेळी बोलताना सांगितले यावेळी राष्ट्रवादीचे काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपकदादा घुमरे, जेष्ठ नेते बप्पासाहेब जाधव, सरपंच शिवाजी नेमाणे,सरपंच आनंद घुमरे,अंगदशेठ भोंडवे लहु नागरगोजे,अविनाश पवार, संजय पवार,मधुकर नागरगोजे सर,राजु नागरगोजे योगेश शिरसाठ सावरगाव सोनेगावसरपंच नारायण नागरगोजे,सुरेश बडे,अनिल दगडखैरबंडू वायभसे, भाऊसाहेब चौरे पाटील,विठ्ठल चौरे ,निलेश देवडेश्रीहरी राख, नाना कवठेकर,बालाजी कवठेकर,महेमुद शेख,बंडु वाघुले रंजित बांदलसोंदाणा रमेश कदम युवराज कदम बाळासाहेब कदम,दत्ता कदम,नारायण गायकवाड,संभाजी कदम,संतोष कदम,दादा कदम,वैद्यकिन्ही भाऊसाहेब भराटे,जयवंत बप्पा शिंदे,रामचंद्र मकाळ,बाबासाहेब शिंदे, लालासाहेबनांदे,प्रकाश कुलकर्णी,रामुकाका लांडगे, विठ्ठल मकाळ,महादेव मकाळ, मारुती मकाळ,वसंत शिंदे, पांडुरंग शिंदे,पिराजी शिंदे,वाघीरा अशोक बांगर,प्रकाश बांगर,नारायण आण्णा बांगर, बाबासाहेब बांगर,मदन बावने, नवनाथ बांगर,सर्जेराव बांगर,जिवन बावने,सुरेश बांगर, विठ्ठल बांगर,बाळासाहेब बांगर, अक्षय बांगर,अजिनाथ बांगर,विजय बांगर,सोमीनाथ बांगर,मेंगडेवाडीयेथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला सदिच्छा भेट दिली.वतसेच को प बंधाराचे भुमीपुजन केले.यावेळी जेष्ठ नेते बाबासाहेब भाऊ शिंदे,सुरेश शिंदे,भिमराव बांगर,हनुमान शिंदे,राजाभाऊ कदम,भागवत रांजवन,विष्णु शिंदे,कैलास शेंडगे,उत्तम खिलारे तसेच ग्रामस्थ,महिला यांच्यासह धानोरा गणातील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धर्मज क्रॉप गार्ड लिमिटेड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना ७८ वा स्वातंत्र्यदिनानिमित्त परीक्षेचे पॅड वाटप



लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव तालुक्यातील कोंडवाडा व खाबा सिंनंगी येथील विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड वाटप करण्यात आले ७८ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त कोंडवाडा खांबा शिंनगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांना २६३ परीक्षा पॅड वाटप करण्यात आले असून या वेळी धर्मज क्रॉप गार्ड लिमिटेड मार्केटिंग मॅनेजर श्री निलेश देशमुख , व सेल्स ऑफिसर श्री पांडुरंग दुधाटे, सो चंद्रभागाबाई मुळे, सौ अनिता बाई मुळे, शाळेचे मुख्याध्यापक नामदेवराव कोल्हार सर, व आदी शिक्षक मान्यवर उपस्थित होते.

## मंठा बाजार समितीमध्ये सभापती ए.जे.बोराडे यांच्या हस्ते ध्वजारोहण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी येथील बाजार समितीमध्ये सभापती ए जे बोराडे यांच्या हस्ते सकाळी ८ : २५ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक अण्णासाहेब खंदारे, संतोष वरकड, प्रल्हादराव बोराडे, वैजनाथ बोराडे, दत्तप्रसाद बनसोडे, प्राचार्य सचिन राठोड, बाबाराव राठोड, केशव महाराज सरकटे, मुस्तफा पठाण यांच्यासह अंकुशराव अवचार, भारतसेठ बोराडे,बालासाहेब बोराडे, जे.के. कुरेशी,अच्युतराव बोराडे, प्रदीप बोराडे, उबेद बागवान, बाजखान पठाण, अरुण वाघमारे, सिराजखान पठाण, कयूमभाई कुरेशी, मुसाभाई कुरेशी, शबाब भाई कुरेशी, सगीर पठाण, शेख इजाजोद्दीन, पप्पू दायमा, मारोतराव बोराडे, रंजीत दांगट, बाळू जोशी, गणेश सराफ, विलास उन्हाळे,



लक्ष्मण बोराडे, बाजार समितीचे सचिव रमेश बोराडे, बालाजी कुलकर्णी, शिवाजी छानवाल, श्याम हजारे, रावसाहेब मोरे, अजय जाधव,शेख वाजिद, किरण गोरे, संभाजी बोराडे यांची उपस्थिती होती.

## मुंबईत कुकरचा अन् बार्शीत ७०० कोटींचा घोटाळा–रोहित पवार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहमदनगर (वृत्तसंस्था)**

आमदार रोहित पवार यांनी महायुती सरकारवर जोरदार निशाणा साधला असून त्यांनी घोटाळ्याचे आरोप केले आहेत. रोहित पवार म्हणाले की, मुंबईतील कुकर घोटाळ्यासोबतच आता बार्शीत ७०० कोटींचा घोटाळा आहे. तसेच, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतही कुत्र्याच्या लसीकरणामध्ये पाच कोटींचा घोटाळा करण्यात आलेला आहे. आता आम्ही 'एमएसआयडीसी'चा १२००० कोटींचा घोटाळा बाहेर काढला आहे. म्बुलन्समध्ये सहा हजार कोटींचा घोटाळा केला आहे. तर हे सरकार घोटाळेबाज सरकार असल्याचा हल्लाबोल रोहित पवार यांनी केला. ते अहमदनगरमध्ये बोलत होते.

राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना या सरकारने आणल्याने विरोधकांच्या मनात भीती आहे, असं म्हटलं होतं. त्यावर बोलताना रोहित पवार यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. लाडकी बहीण योजनेसाठी लागणारा निधी कुठून येणार याची तरतूद न करता तुम्ही केवळ योजना जाहीर करता. योजना जाहीर केली तर ती पूर्णत्वास नेली पाहिजे हे सरकार तीन महिने पैसे देतील आणि नंतर योजना बंद करतील असेही रोहित पवार म्हणाले.

## तळणी ग्रामस्थांचे अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी दुसऱ्यांदा उपोषण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

सार्वजनिक विहिरीच्या जवळचे दगडाचे बेसमेंट व शेडचे अतिक्रमण काढावे, बौद्धविहारा कडे जाणाऱ्या सिमेंट काँक्रीट रस्त्यावरील पत्राचे शेड ठोकून केलेले अतिक्रमण काढावे या मागणीसाठी तळणी (ता.मंठा) येथील ग्रामस्थांनी १४ ऑगस्ट पासून पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. विशेष म्हणजे प्रशासनाचे दिरंगाईमुळे वर्षातून दुसऱ्यांदा आमरण उपोषण करण्यात येत आहे. दरम्यान उपोषणकर्त्यांपैकी काहींची प्रकृती खालावत चालली असली तरीही त्यांनी वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्याची



माहिती समजते. अतिक्रमण काढून द्या अन्यथा आमच्या अंत्यविधीला या अशा प्रकारचे बॅनर उपोषणकर्त्यांनी लावले आहे. ९ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उपोषणकर्त्यांनी १४ ऑगस्ट पासून उपोषण सुरू केलेले आहे. प्रशासनास अनेक वेळा निवेदन देऊनही अद्याप अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. सदरील अतिक्रमण हटविल्याशिवाय आम्ही उपोषण सोडणार नाही. अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली आहे. या उपोषणकर्त्यांमध्ये गुलाब सदावर्ते, बाळू सदावर्ते, विनोद सदावर्ते, अंकुश सदावर्ते, संतोष सदावर्ते, बबन सदावर्ते, शिवाजी गायकवाड,पांडुरंग सदावर्ते, अभिजीत सदावर्ते यांचा समावेश आहे.

## एस.के.कटारिया न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज काळेवाडी शाळेचे ध्वजारोहण डॉ.प्रमोद रंधवे यांच्या हस्ते संपन्न




लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

एस. के. कटारिया न्यू इंग्लिश स्कूल व जूनियर कॉलेज काळेवाडी ता.दौंड येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात पार पडला .ध्वजारोहण सामाजिक कार्यकर्ते डॉ.प्रमोद रंधवे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष पोलीस पाटील राधिका पहाणे यांनी भूषवले.

यावेळी शाळेतील लहान मुलांचे सुंदर भाषणे झाले. तालुकास्तरावर घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.इंग्रजी माध्यमांची शाळा असताना सुद्धा सर्व प्रकारच्या ऍक्टिव्हिटीज मध्ये व राष्ट्रीय सणांचे महत्त्व लहानपणापासून मुलांना कळावे याबाबतीत सतत शाळेमध्ये कार्यक्रम राबवले जातात.यावेळी सामाजिक कार्यकर्ते हनुमंत गायकवाड,विलास चव्हाण,नानासाहेब विरकर आणि पालक मोठ्या उपस्थित होते .सूत्रसंचालन हरीश खेडकर सर आणि पाटील सर यांनी केले, प्राचार्य पूजा मॅडम यांनी आभार मानले.

## उद्धव साहेबच महाराष्ट्राचे नेतृत्व करून महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करू शकतात–डॉ.बच्छिरे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

लोणार १४ शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब ठाकरे महाराष्ट्र चे नेतृत्व करून महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करू शकतात असे वक्तव्य शिवसेनेच्या तालुकास्तरीय कार्यक्रमात जिल्हा संघटक प्रा.डॉ. गोपाल बछिरे यांनी केले.

शिवसेना भवन लोणार येथे भगवा सप्ताह समारोपाच्या आयोजित कार्यक्रमात डॉ. बछिरे बोलत होते, ते पुढे म्हणाले विरोधक उद्धव साहेबांच्या शिवसेनेस शिल्लक सेना असे उपहासात्मक बोलत होते परंतु महाविकास आघाडीच्या माध्यमाने शिल्लक सेना काय करू शकते हे लोकसभेच्या निवडणुकीत विरोधकांना




दाखवून दिले शिवसेना,राष्ट्रवादी, राष्ट्रीय काँग्रेस पक्षात फोडतोड करून भारतीय जनता पार्टीच्या देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना व राष्ट्रवादी व काँग्रेस संपवण्याचा अतोनात प्रयत्न केला परंतु शिवसेना, राष्ट्रवादी व राष्ट्रीय काँग्रेस या जनसामान्यांच्या मनात मनात रुजलेल्या आहेत, नेते फुटले नेत्यांचे ठेकेदार फुटले परंतु शिवसैनिक तथा कार्यकर्ते हे फुटले नाही. विजयभाऊ मोरे कृ.उ.बा.स. यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला, या कार्यक्रमास, महाविकास आघाडीचे ज्ञानेश्वर चिबडे मामा, शहर प्रमुख गजानन जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, तालुका उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे,श्रीकांत नागरे शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, शहर संघटक तानाजी मापारी, विभाग प्रमुख राजूभाऊ बुधवत,युवासेना तालुकाप्रमुख जीवन घायाळ, युवासेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर, अल्पसंख्यांक शहर प्रमुख इकबाल कुरेशी, युवा तालुकाउपप्रमुख अमोल सुटे, महिला उपजिल्हा संघटिका संजीवनी वाघ, तालुका संघटिका पार्वतीताई सुटे, शहर संघटिका शालिनीताई मोरे, तानाजी अंभोरे अशोक सरदार यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## संजय गांधी विद्यालय कलंबर येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त वृक्षारोपण व ध्वजारोहण संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त संजय गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कलंबर येथे समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मारोतीराव पाटील घोरबांड यांच्या हस्ते वटवृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.शाळेचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते ध्वजारोहण करून स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या भाषण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत गायन करत थोर हुतात्मे व क्रांतीकारक यांच्या बद्दल माहिती सांगितली.महीला शिक्षिका व प्राध्यापिका यांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.मारोती पा.घोरबांड, कलंबर (बु) ग्रामपंचायत चे मा.सरपंच श्री.रावसाहेब पा.भोपाळे, सेवा सहकारी सोसायटी चे मा.संचालक श्री.शिवाजी पा.भोपाळे , सेवानिवृत्त शिक्षक श्री.बापुराव गायकवाड,उद्धवराव भोपाळे, मारोतराव भोपाळे,जिवनराव भोपाळे , बळीराम पाटील प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, संजय गांधी विद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भारतीय स्वातंत्र्याचा ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904